**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७३** **दिनांक —०८/०७/२०२५**

**विभाग —सार्व.बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय —** महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर ) रस्ते करणे पैकी रस्ता क्र. १३ नगर वाचनालय ते गांधी मैदान ,आनंदी बाजार ते गाडगीळ मैदान ते अमरधाम रोड पर्यत रस्ता विकसीत करणे बाबत पी.एम.सी.यांना आदेश होणे बाबत.

--**--

**ठराव —** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर)मंजूर 24 कामापैकी प्रभाग क्रमांक 13 मध्ये अमरधाम ते गाडगीळ पटांगण ते नगर वाचनालय रस्त्याचे काम मंजूर असून तेथील गटारीचे काम अंतिम स्तरावर आहे. त्याचबरोबर त्या ठिकाणी पटवर्धन चौक व परिसर या ठिकाणी शासनाने पाहण्यासाठी देखील रंगारगल्ली पर्यंत व गौरी घुमट पर्यंत वेळोवेळी झालेल्या पाहणीनुसार गटर टाकून घेण्यात आलेली आहे .

प्रत्यक्षात मंजूर रस्त्याच्या लांबी पेक्षा प्रत्यक्षात करावयच्या रस्त्याची लांबी व रुंदी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. परंतु रंगार गल्ली येथे डागवाले ऑफिस ते चितळे रोड हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुमारे तीन वर्षापूर्वी ना- हरकत देवुन मंजूर आहे, परंतु सदर कामांमध्ये फक्त बीबीएम व बीएम कारपेट इतकीच तरतूद आहे .

परंतु रस्ता खोदाई झाल्यामुळे त्या ठिकाणचा बेस पूर्णपणे लूज स्वरूपात झालेला असल्याने त्या ठिकाणी बेस करावा लागणार आहे .त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे जा.क्र. रेषा /९०१ /२०२५ दिनांक २६/०५/२०२५चे पत्रान्वये सदर रस्ता करून घ्यावयाच्या झाल्यास त्या ठिकाणचे मजबुतीकरणाचे काम महानगर पलिकेस करावे लागेल, सदरचे काम करणे मंजूर ठेकेदार दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन यांच्याकडून करणे शक्य आहे त्यामुळे मनपाचे नवीन काम करण्याचे बचत होईल व नागरिकांना देखील रस्त्याची सुविधा तातडीने उपलब्ध होईल.

याकरिता डागवाले ऑफिस ते चितळेरोड रंगार गल्ली या ठिकाणी मंजूर ठेकेदार दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन, यांच्याकडून डांबरीकरणाच्या खाली आवश्यक

असणारे मजबुतीकरणाचे काम निविदा तरतूदीप्रमाणे काम करणेबाबत पीएमसी यांना आदेश होणेस, तसेच होणारा खर्च मंजूर प्रशासकीय रकमेच्या आत करणेस पीएमसी यांना आदेश काढणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेरे लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७४** **दिनांक – ०८/०७/२०२५**

**विभाग – प्रकल्प विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –** प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत नालेगांव सर्व्हे नं. ४४ (आगरकर मळा ) पैकी या ठिकाणी मनपाच्या नियोजित प्रकल्पाकरीता लाभार्थी हिस्सा भरून घेणे बाबत.

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत नालेगांव सर्व्हे नं. ४४ पैकी या ठिकाणी ५०४ सदनिका व मूलभूत सोयीसुविधांचा प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाकरीता मनपामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यात आला असून त्याचे प्रारूप आराखडे व नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रती सदनिकेची अंदाजित रक्कम रू . १५.००लक्ष इतकी येत आहे (सदनिका पाईपलाईन ,गटार,रस्ते ,जागा इत्यादींसह )

मनपामार्फत प्रधानमंत्री आवास योजना २.० नालेगांव सर्व्हे नं. ४४ पैकी (आगारकर मळा ) येथील नियोजित प्रकल्पाबाबत अदयापपर्यत एकुण अंदाजे ७५० अर्ज प्राप्त झाले आहेत. याबाबत मनपामार्फत सदर प्रकल्पाची माहिती देणेकरिता लाभार्थ्यांचे मार्गदर्शन मेळावा आयोजित केला होता. तसेच मनपाची CLTC Cell मधील सर्व कर्मचा-यामार्फत विविध आस्थापना व औदयोगिक वसाहतींमधील कर्मचारी / कामगारांना माहिती देण्यात येत आहे. प्रकल्पाची किंमत प्रती सदनिका अंदाजे रू. १५ .०० लक्ष असून त्यामध्ये २.५ लक्ष रक्कम शासन अनुदान प्रती लाभार्थी प्राप्त होणार आहे. त्यामुळे वरील प्रकल्पातील सदनिकेसाठी प्रती लाभार्थ्याला रू १२.५० लक्ष इतकी रक्कम अतिरिक्त स्वरूपात भरावी लागणारी आहे. याबाबत मनपाकडेस अर्ज केलेल्या नागरिकांना अवगत करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून मा. शासनाकडेस सादर करताना लाभार्थ्यांची नावे निश्चित करून त्याचा DPRमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. यास्तव योजनेमध्ये सहभाग घेणा-या इच्छुक अर्जदारांचे संमतीपत्रे लिहून घेण्यात येत आहे. त्यानुसार आज अखेर २४० अर्जदारांचे संमतीपत्र् प्राप्त झाले आहे. DPR मध्ये नांव समाविष्ट करण्यापुर्वी लाभार्थ्यांकडून मा.आयुक्त ,अहिल्यानगर महानगरपालिका यांचे नावे १.० लक्ष रूपयेचा डिमांड ड्राफ्ट मनपाकडेस जमा करून घेणे आवश्यक राहील. प्रकल्प विभागामर्फत नालेगांव सर्व्हे नं. ४४ या ठिकाणी असलेल्या प्रकल्पाकरीता युनियन बॅक ऑफ इंडिया मुख्य शाखा चितळे रोड, अहिल्यानगर येथे सेव्हीग खाते क्र. ३२२३०२०१०९१६६४७ उघडण्यात आले आहे. त्यामुळे यापोटी प्राप्त होणारी रक्कम ही उपरोक्त खात्यामध्ये जमा करणे योग्य राहील.

१) प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत नालेगांव सर्व्हे नं.४४ येथे ५०४ सदनिका AHP चा प्रकल्प राबविणेस
२) प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत नालेगांव स.नं.४४ पैकी या ठिकणी नियोजित प्रकल्पाकरिता लाभार्थी हिस्स्यापोटी सुरवातीस रू.१.० लक्ष इतकी रक्कम भरून घेणेस.
३) प्रकल्पास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर व प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम सुरू करते वेळेस मनपा निश्चित करून देईल त्या टप्पयानुसार वरील खात्यात प्रती लाभार्थी हिस्स्यापोटी पैसे भरून घेणेस
४) सदर कामी लाभार्थी हिस्सा पोटी प्राप्त होणारे डिमांड ड्राफ्ट मनपाच्या वरील प्रमाणे नमुद बॅक खात्यावर भरणे बाबत प्रकल्प विभागाकडील लिपीक टंकलेखक श्रीमती अपूर्वा बाळासाहेब सावळे यांना प्राधिकृत करणेस.
५) सदरची रक्कम युनियन बॅकेचे खाते क्र.३२२३०२०१०९१६६४७ मध्ये स्वतंत्ररित्या भरणेस मा.मुलेअ यांना आदेशित करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

---------------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७५** **दिनांक –०८/०७/२०२५**

**विभाग – प्रकल्प विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी ) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करणेचा प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे बाबत.

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिके करिता स्वच्छ भारत अभियान (नागरी ) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste)कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणी करिता नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०२० / प्र.क्र.२३ / नवि -३४ दिनांक २८ जानेवारी अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे.

गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन नांदेड यांचे मार्फत सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी ) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे बाबत मा.स्थायी समिती प्रस्ताव क्र.०७ दि.१८/०४/२०२२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

ठराव –ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे बाबत Tender ID २०२२ ANMC७५६१७७-१ मधील गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांच्या बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे बाबत प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प उभारणी नंतर सदरचा प्रकल्प पाच वर्षा करिता चालविणेस दरा बाबत याच ठेकेदार संस्थेशी वाटाघाटी करून निश्चित होणा-या दराचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मान्यते करिता पाठविण्यात यावा. सदरचा प्रकल्प उभारणी करून कार्यान्वीत करण्यात यावा. भविष्यात नागरिकांना या प्रकल्पामुळे त्रास झाल्यास प्रकल्प इतर ठिकाणी जागा पाहणी करून स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. याकामी होणारा खर्च महानगरपालिकेने करावा.

सदर ठरावाच्या अनुषंगाने प्रकल्प उभारणे बाबत गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांना जा.क्र.१८ दिनांक ०९/०५/२०२२ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

सदर प्रकल्प उभारणीचे काम विहित मुदतीत पूर्ण न केल्याने सदर कामास टप्या टप्याने ८% दंडनिय आकारणीसह मुदतवाढ देण्यात आली असून सदरची मुदतवाढ दि.३०/०९/२०२४ रोजी संपुष्टात आली आहे. सदरचे काम वाढीव मुदतीत देखील पूर्ण करण्यात आलेले नाही.

सदर प्रकल्प उभारणीचे काम तातडीने पूर्ण करणे बाबत गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांना संदर्भ क्र.८ ते १५ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अदयापपर्यत प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही. यास्तव सदर ठेकेदारास प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्तीचे काम देणे उचित वाटत नाही.

याप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास प्रकल्पाचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर असल्यामुळे ठेकेदारामार्फत प्रकल्प सुस्थितीत व डिपीआर मधील स्पेशिफिकेशन नुसार काम पूर्ण झाले बाबतचे थर्ड पार्टी इन्स्पेशक्शन रिपोर्ट निरी, नागपूर या संस्थेमार्फत करून घेणे आवश्यक आहे. निरी, नागपूर यांचेकडून अहवाल प्राप्त झालेनंतर ठेकेदाराचे अंतिम देयकाबाबत कार्यवाही करणे उचित राहील.

प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती करिता नव्याने खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मनपामार्फत विकसीत करण्यात आलेला बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste)प्रकल्प प्रति दिन ५० मे.टन क्षमतेचा आहे. यामध्ये ठेकेदारामार्फत मनपा हद्यीमध्ये दैनदिन निर्माण होणारे बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) विविध ठिकाणा वरून उचलणे, त्याची वाहतुक करणे, प्रकल्पाच्या ठिकाणी त्यावर प्रक्रिया करणे व उर्वरित साहित्याची विल्हेवाट लावणे इ. कामाचा समावेश करणे आवश्यक राहील.त्यानुसार सोबत जोडलेल्या EOI मध्ये नमुद तपशिल अटी व शर्तीचा समावेश करून खाजगी एजन्सीची नियुक्ती करीता ई-मागविणे आवश्यक आहे. तत्पुर्वी गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांच्या निविदेमधून चालविणे व देखभाल दुरूस्तीचे काम वगळणेच्या अनुषंगाने गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांना नोटीस देणे आवश्यक राहिल. जेणे करून कायदेशीर बाबी उपस्थित होणार नाहीत.

EOI बाबत सविस्तर अटी व शर्ती बाबत तपशिल सोबत जोडला आहे. यामध्ये खालील प्रमाणे ठळक बाबींचा समावेश असेल.

१) शहरात एकूण निर्माण होणा-या अंदाजे ५० मे.टन बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste)शहरातील विविध ठिकाणातून मनपा मार्फत प्राधिकृत केलेल्या यंत्रणे मार्फत सुचना मिळताच २४ तासात सदर ठिकाणचा बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste)उचलणे, त्याची सुरक्षित वाहनाद्वारे सावेडी स.नं.२८९ येथील प्रकल्पाच्या ठिकाणी प्रक्रिया करणे

२) बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) वाहतुक केल्यानंतर प्रकल्पाच्या ठिकाणी नेण्यापूर्वी मान्यता प्राप्त इलेक्ट्रॉनिक वजन काटयावर त्याचे वजन करणे , वजन करणे बाबतचा खर्च ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाचा आहे.

३) शहरात दैनंदिन निर्माण होणा-या बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) वर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे.

४) बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) प्रक्रियानंतर उर्वरित साहित्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे.

५) प्रकल्पाच्या ठिकाणी देखभाल दुरूस्ती बाबत कामगार सुरक्षा बाबत उपाय योजना करणे.

६) ठेकेदाराने शहरात दैनंदिन निर्माण होणारा बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) विविध ठिकाणावरून उचलणे, त्याची वाहतुक करणे व त्यावर प्रक्रिया व विल्हेवाट करणे करिता मनपा मार्फत प्रती टन टिपिंग चार्जेस अदा करण्यात येईल.

७) बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste)वर प्रक्रिया केले नंतर तयार होणा-या उत्पादनाची मालकी ठेकेदाराची राहील.

सदर कामी खाजगी एजन्सीची नियुक्ती करून प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती करीता मनपास ठेकेदारास टिपींग चार्जेस दयावे लागणार आहे. यास्तव प्रकल्प चालविणे कामी प्रति वर्ष अंदाजे रक्कम रू. १.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. करीता

१) गुरू रामदास कंन्स्ट्रक्शन,नांदेड यांच्या मार्फत सुरू असलेल्या कामाच्या निविदेमधून चालविणे व देखभाल दुरूस्तीचा भाग वगळणे कामी गु रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांना नोटीस देवून अवगत करणेस.

२) अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करणेचा प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती करणेसाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करिता EOI मागविणे व EOI नोटीस वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेस.

३) अ.नं.२ चे काम करणेसाठी येणा-या रक्कम रू.१.०० कोटीच्या खर्चास मा.महासभेची मंजूरी मिळणेस.

४) या कामासाठी मनपाच्या सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकात रू.१.०० कोटीची तरतूद करणे.

वरिल प्रमाणे विभागाने सादर केल्यानुसार मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७६** **दिनांक –०८/०७/२०२५**

**विभाग – पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –** UIDSSMT योजने अंतर्गत अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजना फेज -२ योजना राबविणेस ठेकेदाराकडून होत असलेला विलंब, असमाधानकरक प्रगती रखडलेले कामामुळे मे. पार्वती ॲग्रो प्लास्ट यांना काळया यादीत टाकणे बाबत.

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार विषयांकित योजनेचे काम मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांचेमार्फत सुरू असून या योजने अंतर्गत वितरण व्यवस्थे करिता ११० व १६० एमएम व्यासाचे HDPE पाईप्स पुरवठा करणे व अंथरणे जोडणेसाठी मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट, सांगली यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. याकामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक केलेली आहे.

योजनेच्या कामाची गती वाढवून योजनेचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करणे बाबत महानगरपालिके मार्फत आपणास वेळोवेळी सुचना दिल्या होत्या. तसेच मा.महापौर, मा.आयुक्त यांचे दालनात वेळोवेळी झालेल्या आढावा बैठकीमध्ये देखील समक्ष सुचना दिलेल्या आहेत. परंतु नियोजना अभावी योजनेचे काम वेळेत पूर्ण होवू शकलेले नाही.

योजनेचे काम वेळेत पूर्ण न केल्याने एजन्सीला दि.०१/११/२०१७ पासून टप्या टप्याने दंडनीय आकारणी सुरू करण्यात आली होती. याच अनुषंगाने आज अखेर पर्यत रू.१,४४,५७,०००/- इतका दंड वसुल केलेला आहे. तदनंतर दि.०९/११/२०२० रोजी मा.महापौर यांचे दालनात आढावा बैठक झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आकारण्यात येत असलेला दंड दि.२१/०३/२०२० पासून स्थगित करण्याचे ठरले होते. व सदरच्या योजनेचे काम दि.१५/०१/२०२१ अखेर पूर्ण करणार असल्याचे आपले एजन्सीने मान्यही केले होते. असे असूनही या कालावधीमध्ये योजनेच काम पूर्ण केलेले नाही.

विषयांकित कामे पूर्ण करणेसाठी दि.३१/०३/२०२३ पर्यत विना दंड दिलेली मुदतवाढ देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत एजन्सीने योजनेचे काम पूर्ण न केल्याने स्थगित करण्यात आलेली दंडनीय आकारणी रू.५०,०००/- प्रति दिन प्रमाणे दि.०१/०४/२०२३ पासून सुरू करण्यात

आलेली आहे. एजन्सीच्या अशा मनमानी वर्तवणूकीमुळे योजनेचे काम गेल्या ४ वर्षाच्या कालावधी पासून जाणून बुजून बंद ठेवलेले आहे व यामुळे योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरू करता आलेला नसून महानगरपालिकेची बदनामी होत आहे. सद्यस्थितीत सदरची वितरण व्यवस्था महानगरपालिका स्तरावर कार्यान्वित करणेचे काम हाती घेण्यात आलेले आहे. त्यामुळे या कामासाठी येणारा खर्च हा एजन्सीकडून वसुल करण्यात येणार आहे.

योजना पूर्ण करण्याच्या दृष्टिने मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून त्याचा हलगर्जीपणा स्पष्टपणे दिसून येत आहे. व त्यामुळे योजना कार्यान्वित करणे शक्य होत नसल्याने नगर शहरातील नागरिकांना त्याचा पूर्णपणे लाभ देखील देता येत नाही.

योजनेचे काम पूर्ण न झाल्याने उर्वरित कामाची प्रगती असमाधानकारक असल्याने संदर्भ क्र.१०,१२ व १४ अन्वये नोटीस देवून योजनेचे काम तात्काळ पूर्ण करावे अन्यथा कायदेशीर कार्यवाही करून आपले संस्थेला काळया यादीत टाकण्यात येईल असे कळविले होते. त्यास अनुसरून मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांचे संदर्भिय पत्र क्र. ११,१३ व १५ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. तसेच याबाबतीत योजनेचे PMC, म.जी.प्रा. यांचा देखील अभिप्राय मिळणेसाठी अनेक वेळा कळविलेले आहे. परंतु त्यांचे मार्फत कोणताही अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

सदरचा खुलासा पाहता विविध कारणे नमुद करून काळया यादीत न टाकणे बाबत विनंती केलेली आहे. मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांचा खुलासा असमाधानकारक आहे.

तसेच योजनेचे PMC कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.अहिल्यानगर यांना देखील वेळोवेळी अवगत केलेले आहे. परंतु त्यांचेकडूनही याबाबत कोणतेही मार्गदर्शन मिळालेले नाही. PMC सेवा असमाधानकारक असल्याने प्रकल्पाला विलंब झालेला आहे. तसेच म.जी.प्रा. कडून अपेक्षित असलेले तांत्रिक अभिप्राय वेळेत दिलेले नाहीत. यामुळे देखील कामास विलंब झालेला आहे. PMC च्या असमाधानकारक सेवे बाबत मा.सदस्य सचिव ,मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांना याबाबत अवगत करून त्यांचेवर कारवाई करणेसाठी विनंती केली होती. परंतु तसे झालेले नाही.

ठेकेदार एजन्सी मे. मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांचे बरोबर कामाच्या विलंबास PMC म.जी.प्रा.देखील तेवढीच जबाबदार आहे. त्यामुळे त्यांचेवर कारवाई करणे योग्य राहील.

सदर खुलाश्याचे अवलोकन केले असता सदरचा खुलासा हा वस्तुस्थितीशी विसंगत आहे. मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांचेकडील यांना वितरण व्यवस्थे करिता ११० व १६० एमएम व्यासाचे HDPE पाईप्स पुरवठा करणे व अंथरणे जोडणेचे कामे वेळेवर करणे बाबत वेळोवेळी पत्रान्वये सुचित  केलेले होते. परंतु त्यांनी गेली ३ वर्षा पासून कामे बंद ठेवून नागरिकांना व महानगरपालिकेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट यांना काळया यादीत टाकणे आवश्यक आहे.

तथापी शहर पाणी पुरवठा योजना फेज -२ या योजनेचे काम अंतीम टप्यात आलेले आहे. योजनेमधील ७ उपांगापैकी ६ उपांगाची कामे पुर्ण झालेली आहे. वितरण व्यवस्थेमधील डी. आय.पाईप लाईन कार्यान्वित करणे व फ्लो मीटर बसविणे ही कामे काही प्रमाणत अर्धवट आहे.

मे. पार्वती ॲग्रो प्लास्ट, सांगली यांना काळया यादीत टाकलेनंतर उर्वरीत कामासाठी नविन एजन्सीची नेमणूक करावी लागेल. यासाठी अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिध्द करणे, कार्यारंभ आदेश देणे इत्यादी कार्यवाहीसाठी बराचसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या सर्व बाबी टाळण्याच्या दृष्टीने मे. पार्वती ॲग्रो प्लास्ट, सांगली यांना एक शेवटची संधी म्हणून अंतीम नोटीस बजावण्यात यावी. यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५२ विषयाबाबतचे निर्णय**
**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७७** **दिनांक –०८/०७/२०२५**
**विभाग –पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजना फेज -२ राबविणे. होत असलेला विलंब, असमाधानकारक प्रगती मुळे तापी प्रिस्ट्रेस प्राडक्ट JV यांना काळया यादीत टाकणे ची कारवाई करणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना देण्यात आलेले असून यामधील वितरण व्यवस्थेकरिता ११० व १६० एमएम व्यासाचे HDPE पाईप्स पुरवठा करणे व अंथरणे जोडणेसाठी मे.पार्वती ॲग्रो प्लास्ट, सांगली याची नेमणुक करण्यात आलेली आहे. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक केलेली आहे.

योजनेच्या कामाची गती वाढवून योजनेचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करणे बाबत महानगरपालिकेमार्फत आपणास वेळोवळी सुचना दिल्या होत्या. तसेच मा.महापौर, मा.आयुक्त यांचे दालनात वेळोवेळी झालेल्या आढावा बैठकीमध्ये देखील समक्ष सुचना दिलेल्या आहेत. परंतु नियोजना अभावी योजनेचे काम वेळेत पूर्ण होवू शकलेले नाही.

योजनेचे काम वेळेत पूर्ण न केल्याने एजन्सीला दि.०१/०६/२०१४ पासून टप्या टप्याने दंडनीय आकारणी सुरू करण्यात आली होती. याच अनुषंगाने आज अखेर पर्यत रू.२,५८,५५,०००/- इतका दंड वसुल केलेला आहे. तदनंतर दि.०९/११/२०२० रोजी मा.महापौर यांचे दालनात आढावा बैठक झालेल्या चर्चेनुसार आपणास आकरण्यात येत असलेला दंड दि.२१/०३/२०२० पासून स्थगित करण्याचे निर्देश मा.महापौर यांनी दिले होते.

योजनेचे उर्वरित काम दि.१५/०१/२०२१ अखेर पूर्ण करणार असल्याचे मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV या एजन्सीने त्यावेळी मान्यही केले होते. असे असूनही या कालावधीमध्ये योजनेचे काम पूर्ण केलेले नाही.विषयांकित कामाच्या अनुषंगाने एजन्सीला रू.२,५८,००,०००/-इतकी दंडनीय आकारणी करून वसुल करण्यात आलेली आहे.

योजनेच्या विलंबा बाबत एजन्सीस संदर्भिय पत्र् क्र. ५ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे. या नोटीसला देखील वेळेत खुलासा दिलेला नाही विलंबाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने संदर्भिय पत्रतील सर्व बाबींची दखल घेवून मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV या एजन्सीला काळया यादीत टाकणे बाबतची कार्यवाही महानगरपालिके मार्फत सुरू करण्यात आली आहे.

तीन वर्षाच्या कालावधी पासून योजनचे काम बंद केलेले असून अर्धवट स्वरूपात ठेलेले आहे. वास्तविक महानगरपालिकेला कामाची तसेच योजना पूर्ण करणेची घाई असल्याने महानगरपालिकेकडून संस्थेच्या प्रतिनिधीला वारंवार फोन केले जातात. मात्र त्यांचेकडून कोणताही प्रतिसाद महानगरपालिकेस मिळत नाही.

योजने अंतर्गत SCADA प्रणालीचे काम करण्यात आलेले आहे. या प्रणालीसाठी सुमारे रू.५.०० कोटी इतका खर्च झालेला आहे. त्यामुळे ही यंत्रणा कार्यान्वीत करून देणेची जबाबदारी ही एजन्सी व म.जी.प्रा. PMC ची आहे. परंतु सदरची प्रणाली अदयाप पूर्णपणे कार्यान्वीत करण्यात आलेली नाही त्यामुळे यासाठी झालेला खर्च हा पूर्णपणे उपयोगात आलेला नाही.

योजना पूर्ण करण्याच्या दृष्टिने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून त्याचा हलगर्जीपणा स्पष्टपणे दिसून येत आहे. व त्यामुळे योजना कार्यान्वित करणे शक्य होत नसल्याने नगर शहरातील नागरिकांना त्याचा पूर्णपणे लाभ देखील देता येत नाही.

योजनेचे काम पूर्ण न झाल्याने उर्वरित कामाची प्रगती असमाधानकारक असल्याने संदर्भ क्र.६ व ७ अन्वये नोटीस देवून योजनेचे काम तात्काळ पूर्ण करावे अन्यथा कायदेशीर कार्यवाही करून आपले संस्थेला काळया यादीत टाकण्यात येईल असे कळविले होते. त्यास अनुसरून यांचे संदर्भिय पत्र क्र. ९ अन्वये खुलासा सादर केलेला आहे.

सदरचा खुलासा पाहता विविध कारणे नमुद करून काळया यादीत न टाकणे बाबत विनंती केलेली आहे. सदरचा खुलासा असमाधानकारक आहे.

तसेच या योजनेचे अपूर्ण कामाच्या अनुषंगाने मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना काळया यादी टाकणे बाबत तांत्रिक अभिप्राय देणे कामी योजनेचे PMC कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.अहिल्यानगर यांना देखील वेळोवेळी अवगत केलेले आहे. परंतु त्यांचेकडूनही याबाबत कोणतेही मार्गदर्शन मिळालेले नाही. PMC सेवा असमाधानकारक असल्याने प्रकल्पाला विलंब झालेला आहे. तसेच म.जी.प्रा.कडून अपेक्षित असलेले तांत्रिक अभिप्राय वेळेत दिलेले नाहीत. यामुळे देखील कामास विलंब झालेला आहे. PMC च्या असमाधानकारक सेवे बाबत मा. सदस्य सचिव, मा.मुख्य अभियंता,म.जी.प्रा. यांना याबाबत अवगत करून त्यांचेवर कारवाई करणेसाठी विनंती केली होती. परंतु तसे झालेले नाही.

ठेकेदार एजन्सी मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांचे बरोबर कामाच्या विलंबास PMC म.जी.प्रा.देखील तेवढीच जबाबदार आहे. त्यामुळे PCM यांचेवर देखील कारवाई करणे योग्य राहील. संदर्भ क्र. ९ अन्वये प्राप्त खुलाश्याचे अवलोकन केले असता सदरचा खुलासा हा वस्तुस्थितीशी विसंगत आहे. मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांनी योजनेचे काम अदयापही पूर्ण केलेले नाही. तसेच त्यांनी गेली ३ वर्षापासून कामे बंद केलेली आहेत. नागरिकांना व महानगरपालिकेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना काळया यादीत टाकणेस आवशक आहे .

तथापी शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ या योजनेचे काम अंतीम टप्यात आलेले आहे. योजनेमधील ७ उपांगापैकी ६ उपांगाची कामे पुर्ण झालेली आहे. वितरण व्यवस्थेमधील डी. आय.पाईप लाईन कार्यान्वित करणे व फ्लो मीटर बसविणे ही कामे काही प्रमाणत अर्धवट आहे.

मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना काळया यादीत टाकलेनंतर उर्वरीत कामासाठी नविन एजन्सीची नेमणूक करावी लागेल यासाठी अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिध्द करणे, कार्यारंभ आदेश देणे इत्यादी कार्यवाहीसाठी बराचसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या सर्व बाबी टाळण्याच्या दृष्टीने मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना एक शेवटची संधी म्हणून अंतीम नोटीस बजावण्यात यावी. यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |